International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
January 2015
Volume-I , Issue-III
Online Journal
ISSN No. 2347-8268

# बाबुराव बागूल : जीवनपट आणि वाङ्मयीन कर्तृत्व

डॉ. अनिल सी.बोपचे
मराठी विभाग प्रमुख डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,कोंढा–कोसरा,
ता. पवनी, जि. भंडारा

सारांश –

अत्यंत खडतर जीवन जगून बाबुराव बागुलांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. लहाणपणीच त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. अनेक कष्टप्रद कामे त्यांना करावी लागली. रेल्वेच्या नोकरीत त्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. याच अनुभवातून त्यांची 'जेव्हा मी जात चोरली होती' ही प्रसिद्ध कथा साकार झाली. मराठी, हिंदीतील अनेक साहित्यिकांचे साहित्य वाचल्यामुळे बागुलांनी याच उर्मीतून आपल्या साहित्यलेखनास सुरुवात केली. 'जेव्हा मी जात चोरली होती' व 'मरण स्वस्त होत आहे' हे दोन कथासंग्रह त्यांनी साकार केले. 'सूड', 'अघोरी' आणि 'कोंडी' या कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या. 'दलित साहित्यः आजचे क्रांतीविज्ञान' हे समीक्षात्मक पुस्तकही त्यांनी लिहिले. बाबुराव बागुलांच्या साहित्यातून मानवधिष्ठित, कल्याणकारी, परिवर्तनवादी भाव प्रकट होतात. 'माणूस हाच विश्वाच्या जडणघडणीच्या एकमेव कर्ता आहे' हा त्यांचा विचार त्यांच्या प्रगल्भ बुद्धीवादाची स्पष्ट ग्वाही देतो. एक तत्वचिंतक कवी, कथाकार, कादंबरीकार, समाजचिंतक, विचारवंत म्हणून बाबुराव बागुलांचे नाव मराठी साहित्यात मोठ्या आदराने घेतले जाते.

जीवनपट –

मराठी साहित्यात ज्येष्ठ विद्रोही साहित्यिक म्हणून मान्यता पावलेले बाबुराव रामचंद्र बागूल यांचा जन्म नाशिक जिल्यातील 'विहीतगाव' येथे 17 जुलै 1930 ला एका दलित कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. नंतरचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण हे दादर विद्यामंदीर मुंबई येथे झाले. मुंबइत ते 'माटुंगा लेबर कॅम्प' येथील झोपडपट्टीत मावशीकडे राहत असत. माटुंगा लेबर कॅम्प म्हणजे 'मुंबई नगरीतील महानरक' असे वर्णन एका इंग्रजी वृत्तपत्रकाराने केले होते आणि ते खरे


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

होते. अशा भयानक वातावरणात बाग़ल आपले जीवन व्यतित करत होते. अशाच परिस्थितीत वयाच्या 14 व्या वर्षी बागुलांचे लग्न झाले. त्यावेळेस त्यांच्या पत्नीचे वय पाच–सहा वर्षाचे होते.

बागुलांनी लहानपणी द्रव्यार्जनासाठी मिळेल ती कामे केली. एका डॉक्टरकडे त्यांच्या कंपाऊंडरच्या हाताखाली लागणारा मुलगा म्हणून काम केले. रेशन दुकानावर पावत्या लिहिण्याचे, धान्य देण्याचेही काम केले. लाँड्रीमध्ये बिल लिहिण्याचे काम केले. शिवडीला पेट्रोल किंवा तेलाचे डबे लोटण्याचे काम केले. नंतर ते मध्य रेल्वेमध्ये 'कुली' म्हणून भरती झाले. तेव्हा त्यांचे वय तेवीस–चोवीस वर्षाचे होते. तिथे प्रारंभीच त्यांना लोहार खात्यामध्ये पाठविण्यात आले. इथे त्यांना कष्टाची कामे करावी लागली. लोहार खात्यात वेगवेगळया विभागात बदली होता–होता ते पेंटशॉममध्ये गेलेत आणि तिथूनच त्यांनी रेल्वेची नोकरी सोडली. अशा खडतर प्रवासात बागुलांनी एकून बारा वर्षे मध्य रेल्वेत नोकरी केली.

रेल्वेतील नोकरीत असताना बागुलांनी गुजरातमध्ये 'सूरत' या शहरातील रेल्वेच्या 'ओघना एंजिन शेड' मध्ये नोकरी केली. येथे स्टीम एंजिनाच्या दुरुस्तीचे, रंगरंगोटीचे, साफसफाईचे काम चालत असे. येथे बागुलांना एंजिनमधील कोळसा जो एंजिनाच्या पुढील भागात बॉयलरजवळ असतो त्याच्या आतमध्ये जाऊन एंजिन साफ करावे लागत असे. आतमध्ये राख आणि कोळसाचे एक गुदमरून टाकणारे वातावरण असे. त्यामुळे आत जाणे एक भंयकर शिक्षेसारखेच बागुलांना वाटत असे. त्यामध्ये एंजिन शेडमधोल मुकादम बागुलसारख्या शिकलेल्या मुलांना मुद्दामच एंजिनच्या आत पाठवत असत. तेव्हा बागूल सांगतात की, ''बेकारीला कंटाळलेले आम्ही लोकं हे असह्य होणारं काम करीत असू.'' (या सूरतमधील 'ओघना एंजिन शड' मधील रेल्वेच्या नोकरीत असताना कामगार जीवनाच्या आलेल्या दाहक अनुभवातून व जातीबंधनाच्या जाचातून 'जेव्हा मी जात चोरली होती ' ही प्रसिद्ध कथा जन्माला आली.)

क्रांतीकारक चळवळीची आवड बागुलांच्या ठायी हायस्कूल शिकत असतानाच झाली, म्हणजे वयाच्या सोळाव्या– अठराव्या वर्षी ते क्रांतिकारक चळवळीकडे ओढल्या गेले. शिकत असताना मॅक्झिम गॉर्की, लेनिन, आंबेडकर, मॉर्क्स याची पुस्तके ते वाचत असत. अशाच परिस्थितीत माटुंगा लेबर कॅम्पात राहत असताना त्यांचे एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण

झाले. मात्र ते एस.एस.सी. ला दोन विषयात नापास झाले. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांना नोकरी करणे अपरिहार्य झाले होते. मात्र नोकरी मिळत नव्हती. तेव्हा त्यांना शिक्षक व्हावे असेही वाटू लागले. म्हणून त्यांनी शिक्षक होण्यासाठी ट्रेनिंग कॉलेजमध्ये नाव दाखल केले. व त्यासोबतच मॅट्रीकचे नापास झालेले दोन विषय उत्तीर्ण करण्याचे ठरविले. परंतु त्यांना यश मिळाले नाही. शेवटी ते ट्रेनिंग कॉलेजातही अनुत्तीर्ण झाले. तसेच ते मॅट्रीकही उत्तीर्ण करु शकले नाहीत. मात्र ह्या काळात त्यांचे कथालेखन अव्याहत सुरु होते. ट्रेनिंग कॉलेजमध्ये मध्ये शिक्षण घेत असताना लोला आवटे यांच्यामार्फत त्यांची ‘‘दौलत’’ नावाची पहिली कथा 1952 मध्ये ‘आहार’ चे संपादक व्यंकटेश वकील यांच्याकडे दिली. त्यांनी ती ‘आहार’ च्या दिवाळी अंकात छापली. नंतरच्या काळात ‘युगांतर’ मध्ये बागुलांची ‘तुरुंग नावाची कथा छापून आली. ही कथा वाचल्यावर शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी टोका केली. म्हणून बाग्‌ल नंतरच्या काळात अधिक प्रगल्भ वैचारिकतेतून आणि सखोल अभ्यासातून कथालेखन करू लागले.

1953—54 मध्ये बागुलांना रेल्वेत नोकरी मिळाली, तेव्हा त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. त्यामुळे ते पुस्तके, मासिके खरेदी करत असत. किंबहुना यामुळे त्यांच्या घरातील लायब्ररी वाढत होती. जैन, हिंदू, खिश्चन, बौद्ध आणि मार्क्स, पं. नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गांधीजी यांच्यावरचे ग्रंथ आणि कित्येक कथा—कादंबऱ्या बाग्‌ल विकत आणत असत. तसेच हिंदीतले कितीतरी लेखक, कवी यांचीही पुस्तके त्यांनी आणलेली होती.

रल्वेत नोकरी मिळालेल्या काळात बागुलांना कवितेने, क्रांतीने तत्त्वज्ञानाने झपाटले होते. बाबासाहेबांच्या जीवन, कार्य व लेखनातून अनेक वाङ्‌मयीन मूल्ये त्यांना सापडू लागली. बुद्ध व मार्क्सच्या विचारामुळे ते प्रभावित झाले. नकार, विद्रोह, दुःखाची जाणीव, माणसाची महात्मता, अनात्म ज्ञानविज्ञान, निष्ठा, अनिश्वर गतिवाद, करुणा, बंध्‌त्व, वीरत्व अशी मूल्ये त्यांना प्राप्त झाली. या अनुषंगाने मार्क्स—आंबेडकर, गांधी— आंबेडकर असे भांडण आहे असे बागुलांना वाटत नव्हते. बाबासाहेब आंबेडकर, राहुल सांस्कृत्यायन, लालजी पेंडसे, मॅक्झिम गॉर्की, चेकॉव्ह, मानवेंद्रनाथ रॉय, पं. नेहरु, लक्ष्मणशास्त्री जोशी, आचार्य जावडेकर, प्रेमचंद, शरदचंद्र चॅटर्जी आणि इतरही लेखक त्यांचे आवडते लेखक होते. ह्या लेखकांचे साहित्य वाचल्यावर नंतरच्या काळात बागुलांनी एका वेगळयाच ऊर्मीतून आपले साहित्य लेखन सुरु केले.

लेखनकार्य अव्याहत सुरु असल्यामुळे बागुलांकडे लेखनाच्या वह्यांच वह्या साठत होत्या. त्यांचे अनुभव वाढत होते. मात्र याबरोबरच त्यांच्यावर कर्जही वाढत होते. रेल्वेच्या अपुऱ्या पगारात त्यांच्या घरसंसार चालत नव्हता. रेल्वे सोडावी, माटुंगा लेबर कॅम्पातील खोली सोडावी असे त्यांना वाटत असे. परंत, बेकारीच्या इतक्या यातना, इतकी दुःख त्यांनी सहन केली होती म्हणून त्यांना रेल्वे सोडण्याची इच्छा होत नव्हती. आणि कर्ज एवढे वाढले की, त्यांना दुसरीकडे खोली घेणे शक्यच नव्हते. बागुलांना साहित्य लेखन करण्यासाठी पुरेशी जागा नव्हती, स्वस्थता नव्हती. त्यांचे वाचणे, लिहिणे बागेत अथवा हॉटेलात चाले. त्यांना वाचण्या–लिहिण्यासाठी किंग्ज सर्कलची इराणी हॉटेले तासन् तास बसू देत होती. त्यांच्या मनात खूप खळबळत असे. ह्या खळबळीला कारण जशी त्यांची आर्थिक गरीबी होती, तसेच त्यांचे अनुभव, त्यांचे विचार, त्यांचे वाचन आणि व्यक्त होण्याची अनिवार इच्छाही होती, त्याचप्रमाणे त्यांना माणसाबद्दल वाटणारी करुणाही होती. या अनुषंगाने बागुलाचे लेखन अव्याहत सुरु होते. या निमित्ताने बागुल सांगतात की, ''मी पाहिलेले जीवन केवढे अक्राळ–विक्राळ होते. तिथे दैन्य होते, दुःख होते, दास्य होते, अपमान होते, अधःपतन होते, सद्‌गुण होते, जसे व्यक्तीच्या स्वभावातून येणारे दुःख होते तसेच एकंदर समाजरचनेतून येणारे दुःखही होते, तिथे अनेक थोर कथा, अनेक महाकादंबऱ्या, अनेक महानाटके जन्म घेणार होती, त्या कथा, त्या कादंबऱ्या, ती नाटके तर कुठही दिसत नव्हती.''(दलित साहित्यः आजचे क्रांतीविज्ञान', पृ.236) यावरुन बागुलांचे अनुभवविश्व किती व्यापक होते. याची कल्पना येते.

### वाङ्मयीन कतृत्व –

बाबुराव बागुलांनी इयत्ता चवथीत असतानाच एक कविता लिहून काढली. सुरुवातीच्या काळात त्यांना कवितेने झपाटले होते. त्यांनी भोगलेल्या जगावेगळया अनुभवविश्वातून त्यांची काव्यप्रतिभा जागृत होवून ते अव्याहत काव्यलेखन करत होते. 'वेदा आधी तू होतास' असे खडसावून सांगून त्यांनी आपल्या कवितेतून जीवनाचे वास्तव मांडले. बागुलांच्या कविता नियतकालिकातून प्रकाशित होत होत्या. मात्र बागुलांचा एकही कवितासंग्रह प्रकाशित होवू शकला नाही.

बागुलांना समोरच्या काळात कवितेतून जे अनुभव मांडायचे होते ते योग्यरित्या मांडता येत नव्हते. म्हणून कवितेपेक्षा मोठा कॅनव्हॉस असलेली आणि



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

कुठलीही सांकेतिक किंवा सौदर्यशास्त्रीय मर्यादा किंवा संकेत न पाळणारी अशी लघुकथा लिहायचे त्यांनी ठरविले आणि त्याचप्रमाणे ते लिहित गेले. बागुलांची पहिली कथा 'दौलत' 1952 मध्ये 'आहार' मासिकात प्रकाशित झाल्यानंतर त्यांनी 'भाई' (1952–55) नावाचे नाटक लिहिले. ह्या नाटकाचे एक–दोन प्रयोग माटुंगा लेबर कॅम्पात झाले. त्यानंतर संपादक आचार्य अत्रे, कार्यकारी संपादक सौ. शिरीष पै (आचार्य अत्रेंची मुलगी) यांच्या 'नवयुग' या साप्ताहिकातून बागुलांच्या अनेक कथा प्रकाशित झाल्या. याच कथांचे संकलन करुन 1963 मध्ये 'जेव्हा मी जात चोरली होती' ह्या नावाचे अभिनव प्रकाशन मुंबई या प्रकाशन संस्थेने बाबुरावांचा हा पहिला कथासंग्रह प्रकाशित केला. तेव्हा या कथासंग्रहाचे अभूतपूर्व स्वागत वाचकांनी, समीक्षकांनी केले. व त्या वर्षातील श्रेष्ठ दहा पुस्तकांमध्ये या कथासंग्रहाचा नंबर लागला. बागुलांचा 'मरण स्वस्त होत आहे' हा दुसरा कथासंग्रह 1969 मध्ये प्रकाशित झाला. त्यांनो 'मार्टिन ल्युथर किंग' या महान समाजचितंकाला हा कथासंग्रह अर्पण केला आहे. ह्या कथासंग्रहाला बागुलांनी 'मरण स्वस्त होत आहे' हे नवे नाव एकंदर आपली सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था कशाप्रकारची आहे हे सिद्ध करण्यासाठी दिले आहे. मराठी कथेत कधीही न आलेल्या उपेक्षितांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण करण्याचा प्रयत्न बागुलांनी येथे केला.

या दोन्ही कथासंग्रहावरुन असे लक्षात येते की, बागुलांचे अनुभवविश्व अधिक प्रत्ययकारी असल्यामुळे हे सारे कथेच्या चौकटीत बसवताना ते जणू गांगरल्यासारखे, गोंधळल्यासारखे वाटतात. कथेचा रूपबंध साकारताना त्यांची ताराबंळ उडते, त्यांची कुचंबणा होते. या निमित्ताने शिरीष पै म्हणतात, " असे वाटते की, या बीजाला कथा या वाङ्मयप्रकाराचा भूभाग लहान पडतो. याला वाढायला कादंबरी वा खंडकाव्यासारखे विशाल मैदान हव. खूप ऊन, खूप पाऊस, खूप वारा हवा. शेकडो पारंब्यांच्या दाटीमुळे अजस्त्र दिसणारा वटवृक्ष होऊ शकेल हे बीज." (जेव्हा मी जात चोरली होती' च्या प्रस्तावनेतून, पृ.7). बागुलांच्या लिखाणातील आवेग आणि गती पाहून उपरोक्त शिरीष पै यांचे विचार रास्त वाटतात. या गोष्टींचा परिणाम की काय बागुलांनी समोरच्या काळात कादंबरी लेखनावर भर दिलेला दिसतो.


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

1970 मध्ये बागुलांची 'सूड' ही लघुकादंबरी प्रसिद्ध झाली. या लघुकादंबरीने बागुलांनी वाचकाना चक्रावून सोडले. मराठी साहित्यातील एक अव्वल, श्रेष्ठ दर्जाची कलाकृती म्हणून तिचा पुरस्कार करण्यात आला. जानकी नावाच्या दलित, शोषित स्त्रीने स्वामीसारख्या वर्णविहीन, वर्गविहीन, संस्कृतिविहीन, धर्मविहीन अशा अशा निसर्गदत्त पुरुषाला आपले स्त्रीत्व अर्पण करुन दोषपूर्ण समाजावर सूड घेतला असा एक तार्किक विचार या कादंबरीतून बागूल मांडताना दिसतात. 'दलित साहित्यातील चाकोरीबाहेरील लेखन' असे या कादंबरीबद्दलचे मत डा. म.ना.वानखेडे व्यक्त करतात.

बाबुराव बागुलांनी 'भूमिहीन', 'सरदार', 'पाषाण', 'अपूर्वा', 'मूकनायक' तसेच 'तिसरी लाट' या कादंबऱ्याचे लेखन केले. मात्र ह्या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित होवू शकल्या नाहीत. याचबरोबर बागुलांनी 'पावश्या' नावाची दिर्घकादंबरी लिहिली. 'पावश्या' ही बागुलांची आंबेडकरी आंदोलनापूर्वीचा महार समाज आणि त्यानंतरचा महार समाज असा प्रदोर्घ कालखंडाचा समावेश असलेली तसेच शेकडो पात्रे, प्रसंग असलेली जवळजवळ 1800 ते 1900 पाने व्यापून गेलेली महाकादंबरी आहे. या कादंबरीचा काही अंश खुद्द बाबुराव बागूल संपादक असलेल्या 'आम्ही' या मासिकातून प्रकाशित झाले. परंतु हे मासिक पुढे बंद झाल्यावर 'पावश्या प्रकाशित होणे थांबले.

1983 मध्ये बागुलांची 'अघोरी' कादंबरी प्रकाशित झाली. या कांदबरीला ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली आहे. या कादंबरीत सामाजिक अन्यायाविरुद्ध आणि रुढीपंरपरेविरुद्ध विद्रोह पुकारला आहे. या कादंबरीच्या निमित्ताने बागुलांच्या बेफाम लेखनशैलीचे समर्थ दर्शन घडते. किंबहुना बाबुरावांची 'अघोरी' सामाजिक अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध बंडाची प्रेरणा देते. श्रृंगार, बीभत्स, क्षोभक तशा प्रासादिक, सालंकृत भाषासौंदर्य हे या कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य. तसेच अत्यंत संक्षेप, सुमधुर, अर्थलक्ष्मी, एकेरी पण परिणामकारी संवादसामर्थ्य हे या कादंबरीचे लक्षणीय वैशिष्ट्य ठरते. प्रस्तुत कांदबरीमध्ये अघोरी या तांत्रिकाशी सामना करण्यासाठी जेव्हा गावातला पाटील हतबल होतो तेव्हा तो गावातील महार–मांगाची

मदत घेवून अघोरीबाबाला संपवतो. तत्पूर्वी पाटील गावातल्या लोकांना जुमानत नसे. अशा स्वरूपाचा कथाविषय बागुलांनी या कादंबरीत मांडला आहे.

'कोंडी' ही बागुलांची 2000 मध्ये प्रसिद्ध झालेली कांदबरी. मुळात ही कादंबरी प्रकाशित होण्याच्या 30 वर्षापूर्वी बाबुरावांनी लिहीली होती. या कांदबरोत बागुलांनी मुंबईमधील 'माटुंगा लेबर कॅम्प' यातील खालच्या पातळीवरील जीवन, तेथील राजकीय कार्यकर्ते व व्यावसायिक यांच्यातील ताणतणाव, तेथील सत्तास्पर्धा, अस्थिरता, अमानुषता आणि असुरक्षितता, गलिच्छपणा आणि अनाचार या सर्वाचे अंत्यत अंतर्भेदक चित्रण केले. समकालीन वास्तवाचा अंतर्भेद करुन युगसमांतर परिवर्तन आणि परिवर्तनाची निकड व्यक्त करणारे, परिवर्तनाचे निर्देश देणारे बागुलांचे 'कोंडी' या कादंबरी सारखे लेखन, अक्षर वाङ्मय ठरावे एवढ्या श्रेष्ठ दर्जाचे, योग्यतेचे आहे.

बागुलांनी वचारिक च समीक्षात्मक लेखनही केले. त्यांचे 'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान' हे पुस्तक 1981 ला प्रसिद्ध झाले. या पुस्तकामध्ये बागुलांचे 1980 पर्यंतचे लेख, प्रस्तावना, समीक्षा, मुलाखती, स्वगत व भाषणे यांचा समावेश आहे. त्यांचे हे वैचारिक व समीक्षात्मक पुस्तक म्हणजे एक श्रेष्ठ कलात्मक विद्रोही अविष्कारच होय. या पुस्तकात गौतम बुद्ध, डॉ. आंबेडकर व मार्क्स यांचे अमूल्य विचार त्यांनी व्यक्त केले आहेत. तसेच यात त्यांनी दलित साहित्याविषयी व विविध साहित्यकृतींच्याविषयी आपले परखड मत मांडलेले आहेत. यातील विविध लेखावरुन बागुलांचा साहित्यविषयक दृष्टीकोन लक्षात येतो.

बाबुराव बागुलांनी 'आंबेडकर भारत' (भाग1 व 2 ) हा चरित्रात्मक कथासंग्रह लिहिला. या चरित्रात्मक कथासंग्रहालाही मोठी लोकप्रियता लाभली.

सारांश, बागुलांची मानवी जीवनावर श्रद्धा असल्यामुळे ते माणसाच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवतात. म्हणूनच ते माणसाला महान मानतात. 'माणूस हाच विश्वाच्या जडणघडणीचा कर्ता आहे'. हा त्यांचा विचार त्यांच्या प्रगल्भ बुद्धीवादाची स्पष्ट ग्वाही देतो. म्हणून त्यांच्या साहित्यातून मानवधिष्ठित, कल्याणकारी, परिवर्तनवादी भाव प्रकट होताना दिसतात. बागुलांनी आपल्या कथा–कादंबऱ्यातून

बहिष्कृत वर्गाचे अत्यंत सशक्त चित्रण केले. एवढेच नव्हे तर त्यांनी कष्टकऱ्यांना साहित्यात नायकत्व प्रदान केले. यावरुन त्यांची या तळागाळातल्या लोकांविषयीची खरी तळमळ लक्षात येते. त्यांच्या या वाङ्मयीन कामगिरीमुळे एक तत्वचिंतक कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार आणि समाजचिंतक विचारवंत म्हणून बाबुराव बागुलांचे नाव मराठी साहित्यात मोठया आदराने घेतले जाते.

आयुष्याच्या शेवटपर्यंत बागुलांना दुःखाशी, दैन्याशी, हलाखीच्या परिस्थितीशी सामना करत जगावे लागल. अशा खडतर जीवनप्रवासात या ज्येष्ठ विद्रोही साहित्यिक बाबुराव बागुलांचे प्रदोर्घ आजाराने 26/03/2008 ला वयाच्या 77 व्या वर्षी नाशिक येथे निधन झाले. त्यांच्याकडे पत्नी, दोन मुलगे आणि दोन मुली असा आप्त परिवार होता. बागुल रुग्णालयात मृत्युशी झुंजत असतानाच त्यांचा मोठा मुलगा मिलिंद याचे दुःखद निधन झाले. अशा दुःखाच्या, दारिद्रयाच्या वेदना भोगतच बाबुराव बाग्ल हे जग सोडून गेले.

## निष्कर्ष –

दलित साहित्यातील एक सशक्त लेखक, समीक्षक म्हणून बाबुराव बाग्ल आज मराठी साहित्याला परिचयाचे आहेत. एका गरीब कुटुंबात जन्माला येवून त्यांनी आपल्या प्रतिभेच्या बळावर दलित साहित्यातच नव्हे तर एकूण मराठी साहित्यविश्वात आपले स्थान निर्माण केले, ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. माटुंगा लेबर कॅम्प या सारख्या गलिच्छ झोपडपट्टीत विपरीत व वाईट परिस्थितीत राहूनही एक विचारसंपन्न व सौंदर्यपूर्ण निकोप दृष्टीचा परिचय त्यांनी मराठी साहित्यविश्वाला दिला. किंबहुना त्यांचे कार्य वाखाणण्यासारख आहे.

## संदर्भ –

1. इंगळे मालती (2009) ‘बाबुराव बागुलःव्यक्ती आणि वाङ्मय’, देवयानी प्रकाशन मुंबई.
2. पुलावळे सुभाष (2014) ‘बाबुराव बागुलाच्या कादंबऱ्याःआशय आणि आकलन’ चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.

3. बागूल बाबुराव (1981) 'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान', बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.
4. बागूल बाबुराव (1963) 'जेव्हा मी जात चोरली होती',अभिनव प्रकाशन, मुंबई.
5. बागूल बाबुराव (1969) 'मरण स्वस्त होत आहे', अभिनव प्रकाशन, मुंबई.
6. बागूल बाबुराव (1970) 'सूड', अभिनव प्रकाशन, मुंबई.
7. बागूल बाबुराव (1983) 'अघोरी', अक्षर प्रकाशन, मुंबई.
8. बागूल बाबुराव (2000) 'कोंडी', स्वरूप प्रकाशन, मुंबई.